**॥ श्री ॥**

**॥ बाबा ॥**

उदय ही नाही अस्त ही नाही
बाबा त्रिकाळी भ्रमण करती
भेटता आत्मा परमात्म्याला
मग करे बाबा जन्मा येती ॥ धृ.॥

करण्या दूर अंधःकारा
वेगवेगळया रूपे प्रकाश देती
किती कष्टे पडतात बाबा जीवा
नाही पर्वा त्याची भक्तांसाठी
नाही लोभ त्यांना मानवी देहा
नारळ नी दोन पाने हवीत ॥ 1 ॥

वासनारूपी विष ग्रहण करुनी
बाबारूपी अमृत प्याया देती
लावूनी प्रेम वेडया जीवा
दर्शनाची ओढ भलती देती
मिटूनी डोळे बंद करुनी
बाबा हसत मनी राहती ॥ 2 ॥

बाबांचे कौतुक करण्या पडती
शब्द अपुरे भाषा कमी
B.D.S.I.A.S.M.B.B.S.
बाबानामे रंगून जाती
करुनी उध्दार सर्व जगा
स्वतः त्यापासूनी अलिप्त राहती ॥ 3 ॥

★★★★★